राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत राज्य, विभागीय व जिल्हास्तरीय गुणवत्ता आश्वासन समिती ,गुणवत्ता आश्वासन कक्ष तसेच आरोग्य संस्था स्तरावरील गुणवत्ता आश्वासन चमू गठित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः समिती २०२६/प्र.क्र.२७४/रुशआ-१ ई.क्र.१७६६३१८

०८ वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १७ ऑगस्ट, २०२६.

वाचा :

१. केंद्र शासनाच्या गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम मार्गदर्शक सूचना २०१३
२. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. गुनिका-२०१४/प्र.क्र.२७५/आरोग्य-३ दि. २२ मे, २०१५.
३. केंद्र शासनाच्या गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम मार्गदर्शक सूचना २०२१
४. केंद्र शासनाचे पत्र क्र. D.O.No.Z.१८०१५/२७/२०२२-NHM-II(Part-२) दि.२ डिसेंबर २०२५
५. केंद्र शासनाचे पत्र क्र.D.O.No.Z.१५०१५/३२/२०२५-NHM-I दि. २८ जानेवारी २०२६
६. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक : स्टारेप्र-२०२६/प्र.क्र.२९१/रु.श.आ-१ ई.क्र. १७६११३१, दि. २४.०७.२०२६

प्रस्तावना:

केंद्र शासनाने राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम (NQAS) अंतर्गत राज्यातील सर्व आरोग्य संस्थांना टप्प्याटप्प्याने राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणन प्राप्त करण्याचे उद्दिष्ट साध्य करून देण्याबाबत निर्देश निर्गमित करण्यात आले आहे. सार्वजनिक आरोग्य संस्थांमधील गुणवत्ता सुधारणा व गुणवत्ता प्रमाणनाशी संबंधित इतर उपक्रम हे केंद्र शासन तसेच राज्य शासनाच्या प्राधान्यक्रमातील महत्वाचे कार्यक्रम आहेत.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम (National Quality Assurance Standards - NQAS) अंतर्गत संदर्भ क्रमांक २ वरील शासन निर्णयान्वये गठीत राज्य, विभागीय व जिल्हास्तरीय गुणवत्ता आश्वासन समित्या, गुणवत्ता आश्वासन कक्ष तसेच विविध आरोग्य संस्थांमध्ये गुणवत्ता आश्वासन चमू पुनर्गठित करून त्यांच्या कार्यकक्षा सुधारित करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम (National Quality Assurance Standards - NQAS) अंतर्गत राज्य, विभागीय व जिल्हास्तरीय गुणवत्ता आश्वासन समित्या, गुणवत्ता आश्वासन कक्ष तसेच विविध आरोग्य संस्थांमध्ये गुणवत्ता आश्वासन चमू खालीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने खालील दर्शविलेल्या प्रमाणे समित्यांचे गठन करण्यात येत आहे.

१) (अ) राज्य गुणवत्ता आश्वासन समितीः-

राज्य गुणवत्ता आश्वासन समितीची संरचना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकारी पदनाम	पदनाम
१	प्रधान सचिव , सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.	अध्यक्ष
२	सचिव २, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई	सहअध्यक्ष
३	आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई	उपाध्यक्ष
४	आयुक्त,शहरी आरोग्य सेवा, मुंबई	उपाध्यक्ष
५	सहसचिव/उपसचिव (संबंधित) , सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
६	संचालक (रुग्णालय), आरोग्य सेवा,मुंबई	सदस्य
७	संचालक (प्राथमिक), आरोग्य सेवा, पुणे	सदस्य
८	अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण , पुणे	सदस्य
९	सहसंचालक (रुग्णालय), आरोग्य सेवा ,मुंबई	सदस्य

अ.क्र.	अधिकारी पदनाम	पदनाम
१०	सहसंचालक (प्रा.आ.कें.) आरोग्य सेवा, मुंबई	सदस्य
११	सहसंचालक (तांत्रिक), आरोग्य सेवा, मुंबई	सदस्य
१२	प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर	सदस्य
१३	उपसंचालक आरोग्य सेवा (शहरी) ,मुंबई	सदस्य
१४	उपसंचालक आरोग्य सेवा (शुश्रुषा), मुंबई	सदस्य
१५	सहाय्यक संचालक, गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम आरोग्य सेवा, मुंबई	सदस्य सचिव
१६	जिल्हा शल्य चिकित्सक ,जिल्हा रुग्णालय यांचा प्रतिनिधी (१)	सदस्य
१७	जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद यांचा प्रतिनिधी (१)	सदस्य
१८	वैदयकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका यांचा प्रतिनिधी (१)	सदस्य
१९	NQAS राष्ट्रीय परीक्षक यांचा प्रतिनिधी (१)	सदस्य
२०	NQAS राज्य परीक्षक यांचा प्रतिनिधी (१)	सदस्य
२१	Tata Institute of Social Sciences (Faculty Member) (१)	सदस्य

१ (अ)-१ राज्य गुणवत्ता आश्वासन समितीतील निवडक सदस्याचे कामकाजाचे स्वरूप -

I. संचालक, (रुग्णालय) आरोग्य सेवा, मुंबई यांना गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम तसेच गुणवत्ता आश्वासनाशी संबंधित सर्व उपक्रमांचे राज्यस्तरीय प्रमुख (State Nodal Authority) म्हणून दायित्व प्रदान करण्यात येत आहे. तसेच यापुढे राज्य गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम त्यांच्या अधिनस्त राबविला जाईल.

II. सहसंचालक, आरोग्य सेवा (तांत्रिक) हे गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाचे प्रथम सनियंत्रण अधिकारी म्हणून कार्यरत राहतील व त्यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम) हे कार्यक्रमाचे निर्वाहन करतील.

III. गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाबाबत सहसंचालक ,आरोग्य सेवा (तांत्रिक) आणि सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम) हे कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयुक्तरित्या खालील जबाबदाऱ्यांचे निर्वाहन करून कार्यक्रमाची अंमलबजावणी करतील.

   a. पोर्टलवरील (Portals) वरील सर्व माहिती (data) (अनुषंगिक आवश्यक माहिती) याचा आढावा घेणे व बैठकीच्या वेळेत विश्लेषणात्मक माहिती सादर करणे.

b. मा. मंत्री व विभागस्तरावर आवश्यकतेनुसार अहवाल सादर करणे.

१ (अ)-२ राज्य गुणवत्ता आश्वासन समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे-

a) गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम राबविण्या संबंधी धोरणात्मक बाबी व मार्गदर्शक सूचना तयार करण्याबाबत मार्गदर्शन करणे व गुणवत्ता आश्वासन धोरण ठरविणे.
b) सर्व शासकिय रुग्णालयांमध्ये देण्यात येत असलेल्या आरोग्य सेवा दर्जेदार असल्याबद्दल खात्री करणे.
c) राज्य व जिल्हा गुणवत्ता आश्वासन कक्षांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे.
d) कुटुंब कल्याण विमा योजनेंतर्गत नुकसानभरपाई प्रकरणांबाबत आढावा घेणे व अंतिम निर्णय घेणे.
e) गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत कार्याचा वेळोवेळी आढावा घेणे.
f) गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात असल्याबद्दल खातरजमा करणे.
g) गुणवत्ता आश्वासन विषयक प्रमुख निर्देशांकामधील कामगिरीचा आढावा घेणे.
h) स्टार रेटिंग प्रणालीनुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील रूग्णालयांचे मूल्यमापन करून तिला पाच स्टारच्या श्रेणीवर सार्वजनिक गुणवत्ता मानांकन देण्याच्या निकषांचे व अनुषंगीक Portals/dash board यांचे संनियंत्रण करणे.

सदर समितीच्या त्रैमासिक बैठका घेण्यात याव्यात.

१ (अ)-३ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया संबंधित गुणवत्ता आश्वासन मार्गदर्शक सुचनेच्या पुस्तकामध्ये दर्शविलेली गुणवत्ता आश्वासन समिती उपरोक्त समितीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

तथापि, जिल्हा गुणवत्ता समिती कडून प्राप्त झालेल्या, कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर झालेल्या तक्रारी किंवा नुकसान भरपाई मागणी प्रकरणांबाबत दखल घेणे, निकाली काढणे तसेच तक्रारी किंवा नुकसान भरपाईबाबत अंतिम निर्णय घेणे याबाबत राज्य कुटुंब नियोजन विमा उपसमिती (State Family Planning Indemnity Subcommittee) सुध्दा स्थापन करण्यात आली असून ती उपरोक्त राज्य गुणवत्ता समितीचाच एक उपभाग असेल व ती कुटुंब कल्याण विमा योजना, २०१३ (Family Planning Indemnity Scheme २०१३) अंतर्गत विहित केलेल्या नियमांनुसार व मुदतीत कार्यवाही करेल.

राज्यस्तरीय उपसमिती

१	आयुक्त (कु.क) व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई	अध्यक्ष
२	संचालक आरोग्य सेवा ,मुंबई	उपाध्यक्ष

३	अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा (कु.क) पुणे	सदस्य सचिव
४	सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कु.क)	सदस्य
५	एक स्त्रीरोग तज्ञ(Gynecologist), जिल्हा रुग्णालय	सदस्य
६	एक शल्यचिकित्सक (Surgeon), जिल्हा रुग्णालय	सदस्य

१) (ब) विभागीय गुणवत्ता आश्वासन समिती :-

राज्य गुणवत्ता आश्वासन समितीच्या अंतर्गत विभागीय गुणवत्ता आश्वासन समिती स्थापन करण्यात येवून सदर समिती सर्व परिमंडळ स्तरावर कार्यरत राहील.

विभागीय गुणवत्ता आश्वासन समितीची संरचना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे-

अ.क्र.	अधिकारी पदनाम	पदनाम
१	विभागीय आयुक्त, संबंधीत प्रशासकीय विभाग	अध्यक्ष
२	उपसंचालक, आरोग्य सेवा, संबंधित परिमंडळ	सदस्य सचिव
३	जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (परिमंडळातील सर्व)	सदस्य
४	जिल्हा आरोग्य अधिकारी ,जिल्हा परिषद (परिमंडळातील सर्व)	सदस्य
५	वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व)	सदस्य
६	प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, संबंधित परिमंडळ	सदस्य
७	जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम अधिकारी (सर्व)	सदस्य
८	शहरी गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम अधिकारी (सर्व)	सदस्य
९	NQAS राष्ट्रीय परीक्षक प्रतिनिधी (१)	सदस्य
१०	NQAS राज्य परीक्षक प्रतिनिधी (१)	सदस्य

विभागीय गुणवत्ता आश्वासन समितीतील निवडक सदस्याचे कामकाजाचे स्वरूप -

गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाच्या सनियंत्रण, मुल्यमापन, अहवाल संकलन, सादरीकरण व प्रशिक्षणाची जबाबदारी प्राचार्य, राज्य आरोग्य प्रशिक्षण संस्था तसेच प्राचार्य, आरोग्य व कु.क. प्रशिक्षण संस्था (संबंधित परिमंडळ) यांची राहील.

१ (ब)-१ <u>विभागीय गुणवत्ता आश्वासन समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे:-</u>

i. केंद्र शासनाने आरोग्य संस्थांच्या गुणवत्ता निर्धारणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना व चेक-लिस्ट अंगिकारणे व त्याची जिल्हा स्तरावर अंमलबजावणी करणे.

ii. राज्यस्तरीय परिक्षक (Assessors) व जिल्हास्तरीय गुणवत्ता आश्वासन चमू यांना आरोग्य संस्थांच्या गुणवत्ता निर्धारणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना, पद्धती व चेक-लिस्ट बाबत प्रशिक्षण देणे.

iii. सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये देण्यात येत असलेल्या आरोग्य सेवा दर्जेदार असल्याबद्दल खात्री करण्यासाठी परिमंडळनिहाय आराखडा तयार करणे.

iv. आरोग्य संस्थांना पूर्वनिर्धारित वेळापत्रकानुसार भेटी देणे.

v. आरोग्य संस्थाच्या भेटीचा अहवाल, भेटीदरम्यान आढळलेल्या त्रुटी व त्यावरील उपाययोजना यासह, राज्यस्तरीय गुणवत्ता आश्वासन कक्षाला सादर करणे.

vi. गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम विषयक प्रमुख निर्देशांकामधील (Key Performance Indicator) कामगिरीचा आढावा घेणे, परिमंडळांतर्गत आरोग्य संस्थांच्या गुणवत्ता आश्वासन अहवालांचे दरमहा संकलन, पृथ:करण KPI च्या अनुषंगाने सादरीकरण करणे.

vii. गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात असल्याबद्दल खातरजमा करणे.

viii. जिल्हा गुणवत्ता आश्वासन कक्षांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे व गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत कार्याचा वेळोवेळी आढावा घेणे.

ix. स्टार रेटिंग प्रणालीनुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील रूग्णालयांचे मूल्यमापन करून तिला पाच स्टारच्या श्रेणीवर सार्वजनिक गुणवत्ता मानांकन देण्याच्या निकषांचे व अनुषंगीक Portals/dash board यांचे संनियंत्रण करावे.

x. पोर्टलवरील (Portals) वरील सर्व माहिती (data) (अनुषंगिक आवश्यक माहिती) याचा आढावा घेणे व बैठकीच्या वेळेत विश्लेषणात्मक माहिती सादर करणे.

सदर समितीच्या त्रैमासिक बैठका घेण्यात याव्यात व बैठकीचा अहवाल राज्य समितीस सादर करावा .

१) (क) <u>जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती :-</u>

जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती जिल्हास्तरावर स्थापन करण्यात येत आहे.

जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीची संरचना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे-

अ.क्र.	अधिकारी पदनाम	पदनाम
१	संबंधित जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२	संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	सहअध्यक्ष
३	सर्व आयुक्त महानगरपालिका	सहअध्यक्ष
४	जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद	सदस्य सचिव
५	जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय	सदस्य
६	संबंधित सर्व वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका.	सदस्य
७	मुख्याधिकारी, नगरपालिका (सर्व)	सदस्य
८	NQAS राष्ट्रीय/राज्य परीक्षक प्रतिनिधी (१)	सदस्य
९	संबंधित जिल्ह्यातील वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय/ ग्रामीण रुग्णालय	सदस्य
१०	जिल्हा गुणवत्ता नोडल अधिकारी	सदस्य
११	महानगर गुणवत्ता नोडल अधिकारी	सदस्य
१२	संबंधित तालुका आरोग्य अधिकारी	सदस्य
१३	जिल्हा/ शहरी गुणवत्ता आश्वासन समन्वयक	सदस्य

१. (क) -१- <u>जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे:-</u>

i. केंद्र शासनाने आरोग्य संस्थांच्या गुणवत्ता निर्धारणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना व चेक-लिस्ट अंगिकारणे व त्याची जिल्हा स्तरावर अंमलबजावणी करणे.

ii. राज्यस्तरीय परिक्षक (Assessors) व जिल्हास्तरीय गुणवत्ता आश्वासन चमू यांना आरोग्य संस्थांच्या गुणवत्ता निर्धारणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना, पद्धती व चेक-लिस्ट बाबत प्रशिक्षण देणे.

iii. सर्व शासकिय रुग्णालयांमध्ये देण्यात येत असलेल्या आरोग्य सेवा दर्जेदार असल्याबद्दल खात्री करण्यासाठी जिल्हानिहाय आराखडा तयार करणे.

iv. गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाबाबतच्या केंद्रशासन व राज्यशासनामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना व धोरणे यांची सर्व आरोग्य संस्था स्तरावर अंमलबजावणी करणे.

v. आरोग्य सेवेमध्ये गुणवत्ता राखण्याचे निकष पाळण्याबाबत कार्यवाही करणे.

vi. जिल्हा गुणवत्ता आश्वासन कक्ष व जिल्हा गुणवत्ता आश्वासन चमू मधील अधिकाऱ्यांचे कौशल्य वाढविणे .

vii. जिल्हयात गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाचे संनियंत्रण करणे.

viii. गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमातील कार्याचा वेळोवेळी अढावा घेणे

ix. गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम जिल्हयातील प्रभावीपणे राबविला जाण्याबाबत खातरजमा करणे.

x. राज्य गुणवत्ता आश्वासन समिती बरोबर गुणवत्ता दर्जा उंचावण्याबाबत समन्वय साधणे

xi. कुटुंबकल्याण विमा योजना अंतर्गत प्रकरणांचा आढावा घेणे व नुकसानभरपाई देण्याबाबत निर्णय घेणे (कुटुंब नियोजन विमा योजनेसंबंधी शासन निर्णय दिनांक ९/५/२०१३)

xii. स्टार रेटिंग प्रणालीनुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील रूग्णालयांचे मूल्यमापन करून तिला पाच स्टारच्या श्रेणीवर सार्वजनिक गुणवत्ता मानांकन देण्याच्या निकषांचे व अनुषंगीक Portals/dash board यांचे संनियंत्रण करावे.

xiii. पोर्टलवरील (Portals) वरील सर्व माहिती (data) (अनुषंगिक आवश्यक माहिती) याचा आढावा घेणे व बैठकीच्या वेळेत विश्लेषणात्मक माहिती सादर करणे.

सदर समितीची मासिक बैठक घेण्यात यावी व बैठकीचा अहवाल दरमहा विभागीय समितीस पाठविण्यात यावा.

जिल्हा कुटुंबकल्याण विमा योजना उपसमिती (District Family Planning Indemnity Sub-committee) वरील समितीत समाविष्ट असेल व त्या अंतर्गत खालील नऊ सदस्यांची उपसमिती स्थापन करण्यात आली असून ती कुटुंबकल्याण विमा योजना, २०१३ (Family Planning Indemnity Scheme २०१३) अंतर्गत शल्य चिकित्सक / आरोग्य संस्था यांचे विरुध्द लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रार/दावा संबंधी विहित मुदतीत निर्णय घेईल.

जिल्हास्तरीय उपसमिती

१	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	अध्यक्ष
२	जिल्हा आरोग्य अधिकारी	समन्वयक
३	जिल्हा शल्यचिकित्सक	सदस्य सचिव
४	वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका	सदस्य
५	जिल्हा आरसीएच अधिकारी/ सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी/ तत्सम अधिकारी	समन्वयक
६	एक स्त्रीरोग तज्ञ, जिल्हा रुग्णालय	सदस्य
७	एक शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय	सदस्य
८	एक भुल तज्ञ, जिल्हा रुग्णालय	सदस्य
९	एक विकृती विशेषज्ञ, जिल्हा रुग्णालय	सदस्य

२. **केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने खाली दर्शविलेल्या प्रमाणे राज्य स्तरावर व जिल्हास्तरावर कक्ष गठीत करण्यात येत आहे.**

२) (अ) राज्य गुणवत्ता आश्वासन कक्ष :-

राज्य गुणवत्ता आश्वासन कक्ष हा राज्य गुणवत्ता आश्वासन समितीच्या देखरेखी खाली कार्य करेल. राज्य गुणवत्ता आश्वासन समितीचा भाग म्हणून राज्य गुणवत्ता आश्वासन कक्ष स्थापन करण्यात येत आहे. सदर कक्षामध्ये खालील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असेल.

अ.क्र.	कक्षातील अधिकारी/कर्मचारी
१	सहसंचालक, तांत्रिक, आरोग्य सेवा ,मुंबई
२	सहाय्यक संचालक, गुणवता आश्वासन कार्यक्रम, आरोग्य सेवा, मुंबई
३	वरिष्ठ सल्लागार, राज्य गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम (१)
४	सल्लागार ,राज्य गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम (१)
५	सनियंत्रण व मूल्यमापन अधिकारी ,राज्य गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम (२)
६	कार्यक्रम अधिकारी ,राज्य गुणवत्ता आश्वासन (२)
७	कार्यक्रम सहाय्यक(२)

२) (अ)-१ राज्य गुणवत्ता आश्वासन कक्षाची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे:-

i. गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम अंमलबजावणीसाठी केंद्रशासन व राज्यशासनाचा समन्वय करणे.
ii. आरोग्य संस्थाच्या प्रत्येक स्तरावर टप्याटप्याने NQAS प्रमाणन आणता येऊ शकेल असा गुणवत्ता आश्वासन विकास आराखडा तयार करणे.
iii. राज्य गुणवत्ता कक्षातील अधिकाऱ्यांची विविध जिल्हयातील आरोग्य संस्थांना भेटी देण्यासाठी कार्यक्रम तयार करणे व भेटी नुसार अहवाल सादर करणे .
iv. प्रशिक्षण नियोजन- राज्यस्तरीय, परिमंडळस्तरीय व जिल्हास्तरीय प्रशिक्षणाचे नियोजनासाठी PHI & NHSRC यांच्या सोबत समन्वय करून राज्यातील सर्व आरोग्य संस्थांना राष्ट्रीय प्रमाणन प्राप्त करण्यासाठी आरोग्य संस्थेतील अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात येईल.

v. परीक्षण नियोजन- NQAS व कायाकल्प कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय, परिमंडळस्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील परीक्षणाचे नियोजन करणे तसेच तद्नुषंगीक बाबींची पूर्तता व परीक्षणाचे सनियंत्रण करणे.

vi. कालमर्यादेचे पालन -प्रशिक्षण आणि परीक्षणासाठी राज्यस्तर व जिल्हास्तरावर दिलेल्या कालमर्यादेचे काटेकोर पालन करील व जिल्हास्तरीय कालमर्यादा पालनाचे सनियंत्रण करील.

२) ब) जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम कक्ष -

जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीच्या देखरेखी खाली कार्य करण्याकरिता जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम कक्ष स्थापन करण्यात येत आहे. सदर कक्षामध्ये खालील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश करण्यात येत आहे.

अ.क्र.	कक्षातील अधिकारी व कर्मचारी
१	जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय
२	जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद
३	वैद्यकिय आरोग्य अधिकारी , महानगरपालिका
४	जिल्हा आर सी एच अधिकारी/ सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी /तत्सम अधिकारी
५	निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्यसंपर्क)
६	वैद्यकिय आरोग्य अधिकारी , महानगरपालिका यांचेकडील संबंधित वैद्यकीय अधिकारी
७	जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
८	जिल्हा लेखा व्यवस्थापक
९	जिल्हा गुणवत्ता आश्वासन समन्वयक
१०	शहरी गुणवत्ता आश्वासन समन्वयक
११	कार्यक्रम सहाय्यक

i. सदर कक्ष जिल्हयातील आरोग्य संस्थांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांच्या गुणवत्तेबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाचे सनियंत्रण करील.

३. जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती व कक्ष यांना गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत उद्दीष्टे गाठण्याकरिता खालील चमू सहाय्य करतील.

३ (अ) जिल्हा /सामान्य रुग्णालय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू :- जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू जिल्हा रुग्णालयाच्या अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाची अंमलबजावणी करेल. सदर चमू जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम कक्षाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार काम करेल, सदर चमूमध्ये खालील प्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकारी पदनाम	पदनाम
१	जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकिय अधिक्षक	अध्यक्ष
२	अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक	सदस्य सचिव
३	प्रभारी अधिकारी- शस्त्रक्रिया तज्ञ,भूलतज्ञ, स्त्रीरोग तज्ञ, बालरोगतज्ञ, भिषक	सदस्य
४	शुश्रुषा अधिकारी (मेट्रन)/ सहा. शुश्रुषा अधिकारी(असि.मेट्रन)	सदस्य
५	परीसेविका - एसएनसीयु/ शस्त्रक्रिया गृह / प्रसुती कक्ष	सदस्य
६	प्रशासकिय अधिकारी	सदस्य
७	औषध निर्माण अधिकारी	सदस्य
८	भांडारपाल	सदस्य
९	अभिलेख अधिकारी	सदस्य
१०	प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी	सदस्य
११	ज्येष्ठ कक्षसेवक	सदस्य

३(ब) उपजिल्हा/ स्त्री रुग्णालय (५० व १०० खाटा)/ ग्रामीण रुग्णालय येथील गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू :-

गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू हा संबंधित रुग्णालयाच्या अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाची अंमलबजावणी करेल. सदर चमू जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम कक्षाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करेल. सदर चमूमध्ये खालील प्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकारी/ कर्मचारी	पदनाम
१	वैदयकिय अधिक्षक	अध्यक्ष
२	स्त्रीरोग तज्ञ, भूल तज्ञ, बालरोगतज्ञ	सदस्य
३	गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम प्रभारी वैदयकिय अधिकारी	सदस्य सचिव

४	सहा. शुश्रुषा अधिकारी(असि.मेट्रन)	सदस्य
५	परिसेविका / शस्त्रक्रिया गृह / प्रसुती कक्ष /एनबीएसयू/ एसएनसीयु	सदस्य
६	प्रशासकिय अधिकारी/कार्यालयीन अधिक्षक/ औषध निर्माण अधिकारी	सदस्य
७	भांडारपाल	सदस्य
८	अभिलेख अधिकारी	सदस्य
९	प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी	सदस्य
१०	ज्येष्ठ कक्षसेवक	सदस्य

३) (क) प्राथमिक आरोग्य केंद्र गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू:-

गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाची अंमलबजावणी करेल. सदर चमू जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम कक्षाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करावी. सदर चमूमध्ये खालील प्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकारीकर्मचारी/	पदनाम
१	तालुका आरोग्य अधिकारी	अध्यक्ष
२	वैदयकिय अधिकारी (संबंधित प्रा.आ.केंद्र)	सदस्य सचिव
३	औषध निर्माण अधिकारी	सदस्य
४	आरोग्य सहाय्यक (पुरुष)	सदस्य
५	आरोग्य सहाय्यक (स्त्री)	सदस्य
६	एएनएम (मुख्यालय), अधिपरीचारिका	सदस्य
७	प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी	सदस्य
८	कनिष्ठ लिपिक	सदस्य
९	कक्षसेवक	सदस्य

३ (ड) आयुष्मान आरोग्य मंदिर -उपकेंद्र गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू:-

गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू संबंधित आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्रांच्या अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी. सदर चमू जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम कक्षाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करावी. सदर चमूमध्ये खालील प्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकारी कर्मचारी /	पदनाम
१	समुदाय आरोग्य अधिकारी (CHO)	अध्यक्ष
२	आरोग्य सेविका (ए.एन.एम.)	सदस्य सचिव
३	बहुउद्देशिय आरोग्य सेवक	सदस्य
४	आशा सेविका	सदस्य
५	आशा गट प्रवर्तक /समन्वयक	सदस्य
६	अंगणवाडी सेविका	सदस्य
७	जन आरोग्य समिती प्रतिनिधी	सदस्य

३) (इ) नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू:-

गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू संबंधित नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी. सदर चमू जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम कक्षाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करावी. सदर चमूमध्ये खालील प्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकारीकर्मचारी /	पदनाम
१	वैदयकिय अधिकारी	अध्यक्ष
२	नोडल अधिकारी NQAS (वैद्यकिय अधिकारी -२)	सदस्य सचिव
३	औषध निर्माण अधिकारी	सदस्य
४	आरोग्य सेविका (एएनएम) (मुख्यालय), अधिपारीचारिका	सदस्य
५	प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी	सदस्य
६	आरोग्य सहाय्यक	सदस्य
७	आशा समन्वयक	सदस्य
८	स्वच्छता कर्मचारी प्रतिनिधी/कक्षसेवक	सदस्य

३) (फ) नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर - आरोग्य वर्धिनी केंद्र व हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू

गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू संबंधित नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्रांच्या अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी. सदर चमू जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम कक्षाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करावी. सदर चमूमध्ये खालील प्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकारी/ कर्मचारी	पदनाम
१	वैदयकिय अधिकारी (UPHC)	अध्यक्ष
२	संबंधित वैद्यकीय अधिकारी/ स्टाफ नर्स	सदस्य सचिव
३	बहुउद्देशिय आरोग्य सेवक	सदस्य
४	आशा सेविका	सदस्य
५	आशा गट प्रवर्तक / समन्वयक	सदस्य
६	अंगणवाडी सेविका	सदस्य
७	महिला आरोग्य समिती प्रतिनिधी	सदस्य
८	जन आरोग्य समिती प्रतिनिधी	सदस्य

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१७११२०३४५८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJASHREE RAHUL SARANG

Digitally signed by RAJASHREE RAHUL SARANG
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fcscpd, 2.5.4.20=5C072530C0F2940404764B5DC00127BB99ECF9466431DC1A1A4E123B229E41C0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2B9A36FAE4EC39263A2A8DF78B48FC28B92B165E239815B0CDCEF1A4B5928579, cn=RAJASHREE RAHUL SARANG
Date: 2026.08.17 12:31:41 +05'30'

(राजश्री सारंग)

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. प्रधान सचिव-१ ,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई
२. सचिव -२ ,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई
३. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
४. आयुक्त, आरोग्य सेवा शहरी,आरोग्य, मुंबई
५. आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
६. अतिरिक्त अभियान संचालक ,राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान , मुंबई
७. संचालक ,आरोग्य सेवा (रुग्णालय) , मुंबई
८. संचालक ,आरोग्य सेवा,, (प्राथमिक) पुणे
९. अतिरिक्त संचालक ,मानसिक आरोग्य, आरोग्य सेवा, मुंबई

१०. अतिरिक्त संचालक ,आरोग्य व कुटुंब कल्याण, पुणे
११. सहसचिव ,सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सहसंचालक) रुग्णालये ,(आरोग्य सेवा ,मुंबई
१३. सहसंचालक ,(कें.आ.प्रा)आरोग्य सेवा मुंबई
१४. सहसंचालक ,(तांत्रिक)आरोग्य सेवा, मुंबई
१५. जिल्हाधिकारी ,जिल्हा (सर्व)
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७. उपसचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई
१८. उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळ (सर्व)
१९. प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर
२०. अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई
२१. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व)
२२. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२३. प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (सर्व)
२४. वैद्यकीय अधिक्षक, रुग्णालये (सर्व)
२५. वित्त विभाग (कोषागारे/ प्रशासन ५), मंत्रालय, मुंबई.
२६. कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
२७. निवडनस्ती (कार्यासन रूशआ-१).

सोबत परिशिष्ट-

१. बैठीकीच्या इतिवृत्ताचा नमुना (परिशिष्ट-अ व ब)
२. विभागाचा मासिक अहवाल नमुना (परिशिष्ट-क)
३. जिल्ह्याचा मासिक अहवाल नमुना (परिशिष्ट-ड)
४. आरोग्य संस्थाचा अहवाल नमुना (परिशिष्ट-इ)

परिशिष्ट-अ

विभागीय गुणवत्ता आश्वासन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत विभागीय गुणवत्ता आश्वासन समितीची बैठक मा. विभागीय आयुक्त, संबंधीत विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि..................रोजी घेण्यात आली . सदर बैठकीत खालील सदस्य उपस्थित होते.

१. ....
२. ....
३. ....
४. ....
५. ....

सदर बैठकीत विभागातील जिल्ह्यांमध्ये गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या अनुषंगाने पुढील निर्णय घेण्यात आले .

अनु.क्र.	विषय	चर्चिला गेलेला मुद्दा	जबाबदार अधिकारी	कालावधी

वरील मुद्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले . सर्वांचे आभार मानून बैठक संपली .

स्वाक्षरी

परिशिष्ट-ब

जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी, जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली दि.................रोजी घेण्यात आली . सदर बैठकीत खालील सदस्य उपस्थित होते.

१. ....
२. ....
३. ....
४. ....
५. ....

सदर बैठकीत जिल्ह्यांमध्ये गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या अनुषंगाने पुढील निर्णय घेण्यात आले .

अनु.क्र.	विषय	चर्चिला गेलेला मुद्दा	जबाबदार अधिकारी	कालावधी

वरील मुद्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले . सर्वांचे आभार मानून बैठक संपली .

स्वाक्षरी

परिशिष्ट-क

विभागीय गुणवत्ता आश्वासन समितीचा अहवाल

शासन निर्णयनुसार विभागीय गुणवत्ता आश्वासन समितीच्या त्रैमासिक बैठका होणे आवश्यक आहे. या बैठकांमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्यास कार्यालयास सदर करण्यात येत आहे .

गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत तपशील :-

अनु.क्र.	विभागाचे नाव	जिल्ह्याचे नाव	एकूण आरोग्य संस्था	State Certified	National Certified	Remark

स्वाक्षरी

परिशिष्ट-ड

जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीचा अहवाल

शासन निर्णयानुसार जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीच्या मासिक बैठका होणे आवश्यक आहे. या बैठकांमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागास सादर करण्यात येत आहे .

गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत तपशील -

अनु.क्र.	विभागाचे नाव	जिल्ह्याचे नाव	एकूण आरोग्य संस्था	State Certified	National Certified	Remark

स्वाक्षरी

परिशिष्ट-इ

आरोग्य संस्थांचा मासिक अहवाल

(DH/WH/GH/SDH/RH/PHC/SC)

शासन निर्णयनुसार गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत आरोग्य संस्थांस्तरावर चमू निर्माण करणे आवश्यक आहे . आरोग्य संस्थांस्तरावर संस्थाचे I/C यांच्या अध्यक्षतेखाली चमूची मासिक बैठक घेण्यात आली . या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार केलेल्या कार्यवाहीचा मासिक अहवाल जिल्ह्याला सादर करण्यात येत आहे .

गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत तपशील -

अनु.क्र.	विभागाचे नाव	जिल्ह्याचे नाव	आरोग्य संस्थेचे नाव	Facility State Certified (Yes/No)	Facility National Certified (Yes/No)	Facility if Not Certified, gaps observed	Compliance as per Gaps

स्वाक्षरी